
दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
बुलडाणा, गुरुवार, दि.१२ जून २०२५
वर्ष : ०४, अंक : ३०१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com




## आजपासून पावसाचा जोर; मुंबई, ठाणेसह 'या' जिल्ह्यांत ४ दिवस यलो-ऑरेंज अॅलर्ट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, मुंबई :** राज्यात बुधवारी काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाने हजेरी लावली असून, दक्षिण कोकणात आज, गुरुवारपासून पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. दक्षिण कोकणासोबत मध्य महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा, सांगली परिसरातही पावसाचा जोर वाढू शकतो.

हवामान विभागाने गुरुवारपासून कोल्हापूर व घाट परिसर आणि सांगली येथे ऑरेंज अॅलर्ट जारी केला आहे, तर दक्षिण कोकणात शुक्रवारपासून ऑरेंज अॅलर्ट देण्यात आला आहे. मुंबई आणि ठाण्यामध्ये यलो अॅलर्ट असून, गुरुवारी काही ठिकाणी मेघगर्जनेसह हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो. मुंबईतील पावसाचा जोर वाढण्यासाठी आणखी दोन दिवस प्रतीक्षा करावी लागण्याचा अंदाज आहे.

मुंबईमध्ये आर्द्रतेमुळे उकाडा जाणवत असून, बुधवारी कुलाबा येथे ३३ तर



सांताक्रूझ येथे ३३.५ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. सकाळच्या वेळी तसेच दिवसभरात आर्द्रताही अधिक होती. दिवसभरात काही ठिकाणी रिमझिम पाऊस पडल्याची माहिती प्रादेशिक हवामान विभागाने दिली. गुरुवारी आभाळ अंशतः ढगाळ असू शकेल तसेच मेघगर्जनेसह मध्यम पावसाची शक्यता आहे. त्यानंतर १३ जूनपासून पावसाचे प्रमाण वाढून तीन दिवस मुसळधार पाऊस पडू शकतो, असा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे.

वाढत्या पावसासोबत तापमानामध्येही घट होऊ शकते. कमाल तापमानाचा पारा ३१ अंशांपर्यंत खाली येऊ शकतो. मुंबई आणि ठाणे जिल्ह्यासाठी बुधवारी दिलेल्या पूर्वानुमानानुसार गुरुवारपासून चार दिवस यलो अॅलर्ट देण्यात आला आहे. मुंबई आणि ठाणे जिल्ह्यात शनिवारी आणि रविवारी एक-दोन ठिकाणी मुसळधार पाऊस पडू शकतो.

दक्षिण कोकणामध्ये रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये शुक्रवारपासून ऑरेंज अॅलर्ट देण्यात आला आहे. शुक्रवारी रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडू शकतो, तर रत्नागिरीमध्ये शुक्रवारी अतितीव्र मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

**विदर्भात मेघगर्जना, वेगवान वारे**


विदर्भामध्येही अकोला, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर येथेही गुरुवारसाठी ऑरेंज अलर्ट आहे. मात्र, या भागामध्ये मेघगर्जनांचे प्रमाण अधिक असेल. तसेच वाऱ्यांचाही वेग ५० ते ६० किलोमीटरपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

## आषाढी यात्रा २७ जुनपासुन भाविकांना २४ तास दर्शन व्यवस्था

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.११, पंढरपूर :** आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी च्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येतात. या आषाढी यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांना मंदिर समिती मार्फत मुबलक सोयी सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. तसेच भाविकांचे सुलभ व जलद दर्शन व्हावे यासाठी दि. २७ जून पासून २४ तास दर्शन व्यवस्था उपलब्ध होणार तसेच टोकन दर्शन प्रणालीची दिनांक १५ जून रोजी पहिली चाचणी घेण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

आषाढी यात्रेच्या अनुषंगाने मंदिर समितीची बैठक सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास येथे संपन्न झाली. सदर बैठकीस मंदिर समितीचे सदस्य शकुंतलाताई नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, अॅड. माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा तसेच पुरातत्व विभागाचे रामेश्वर निपाणे, सार्वजनिक



बांधकाम विभागाचे श्रीनिवास गुजरे, सर्व खाते प्रमुख, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे व जतन - संवर्धनाचे ठेकेदार उपस्थित होते.

शुद्ध आषाढी एकादशी दि. ०६ जुलै रोजी आहे. यात्रेचा कालावधी दि.२६ जून ते दि.१० जुलै असा आहे. शासकीय महापूजा २.२० वाजता मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य व मानाचे वारकरी यांचे शुभहस्ते सपत्नीक श्रीची शासकीय महापुजा केली जाणार आहे. श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन व संवर्धन आराखड्यांचा कामाचा आढावा घेण्यात आला, या यात्रेच्या पार्श्वभूमीवर मंदिर जतन व संवर्धनाची सध्या सुरू असलेली सर्व कामे अंतिम टप्प्यात असून, टोकन दर्शन प्रणालीची दिनांक १५ जून रोजी पहिली चाचणी घेण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. आषाढी यात्रेत भाविकांना सुलभ व जलद दर्शन उपलब्ध करून देण्यावर मंदिर समितीचा भर राहणार असून, दर्शनरांगेत बॅरीकेटींग करून वॉटरप्रुफ मंडप, ४+६ पत्राशेड, विश्रांती कक्ष, फॅब्रिकेटेड शौचालये, लाईव्ह दर्शन, कुलर फॅन, सार्वजनिक सूचना प्रणाली, मिनरल वॉटर, सुरक्षा रक्षक नियुक्ती, आपत्कालिन सुविधा, चहा खिचडी वाटप, आरोग्य व्यवस्थेचे स्टॉल, २४ तास अन्नछत्र, बॅग स्कॅनर मशिन, हिरकणी कक्ष, नदीपात्रात चेंजिंग रूम इत्यादी स्वरूपाच्या सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्याबाबतची सर्व कामे वेळेत पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

प्रतिवर्षीप्रमाणे विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार देणे, टोकण दर्शनाची चाचणी घेणे इत्यादी महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचे राज्याचे मुख्यमंत्री महोदय मा देवेंद्रजी फडणवीस यांना दिनांक १६ किंवा १७ जून रोजी मंदिर समितीच्या वतीने निमंत्रण देण्यात येणार आहे. असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले. त्याचबरोबर चंदनउटी पुजेची दि. १३ जून रोजी सांगता पुजा होणार असून, श्री विठ्ठल व श्री रूक्मिणीमातेची चंदनउटी पुजा अनुक्रमे सदस्या अॅड माधवी निगडे व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके तसेच सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर व व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या शुभहस्ते संपन्न होत आहे. यावेळी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांना शनिरत्न व मानवसेवा जीवनगौरव राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यात आला.

## 'स्थानिक स्वराज्य' साठी मतदान यंत्राची माहिती मागवली ; पावसाळ्यानंतर रणधुमाळी...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, अहिल्यानगर :** जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाकडून निवडणूक पूर्व तयारी सुरू करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाने जिल्ह्यातील ईव्हीएम मशीनची माहिती मागविली आहे. जिल्ह्यात उपलब्ध असणाऱ्या मतदार यंत्राची माहिती आयोगाला कळवल्यानंतर निवडणुकीसाठी आवश्यक पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

राज्य निवडणूक आयोगामार्फत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जाणार आहेत. राज्यामध्ये २६ महानगरपालिका, २३० नगर परिषदा, १०८ नगर पंचायती, ३४ जिल्हा परिषद, ३५१ पंचायत समित्या आणि २७,७८१ ग्रामपंचायती आहेत. दर पाच वर्षांनी निवडणुका घेऊन सुमारे २.५ लाख लोकप्रतिनिधी निवडले जातात. मात्र, गेल्या तीन वर्षांपासून या निवडणुका रखडल्या आहेत. कालावधी संपलेल्या या संस्थांवर प्रशासक राज आहे.

दरम्यान, ग्रामपंचायतींच्या निवडणुका नियमित कालावधी पूर्ण झाल्यावर होत आहेत. मात्र, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या निवडणुकाही रखडल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांत रखडलेल्या निवडणुका घेण्याचा आदेश दिला आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक पूर्व



कामाला सुरूवात केली आहे. याचाच भाग म्हणून जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या ईव्हीएम मशीनची माहिती आयोगाने मागविली आहे.

लोकसभा निवडणुकीसाठी अहिल्यानगर आणि शिर्डी असे दोन मतदारसंघ आहेत. अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांनी या निवडणुकीला औरंगाबाद खंडपीठात आव्हान दिले आहे. त्यामुळे या मतदानासाठी वापरलेली ईव्हीएम मशीन संरक्षित करून ठेवली आहेत. विधानसभा निवडणुकीतील काही मतदारसंघातील निवडणुकीला खंडपीठात आव्हान दिले आहे. ज्या मतदारसंघातील उमेदवारांनी खंडपीठात धाव घेतली आहे, तेथील ईव्हीएम मशीन संरक्षित करण्यात आल्या आहेत. पारनेर मतदारसंघातील निवडीला आव्हान दिले आहे.

दरम्यान, आता पावसाळा सुरू झाला असून या काळात निवडणुका घेणे शक्य नाही. तसेच नगर जिल्हा हा परतीच्या पावसाचा जिल्हा असून जिल्ह्यात दिवाळीनंतर पाऊस थांबतो. शिवाय गणेशोत्सव व नवरात्रौत्सव या काळात निवडणुका घेता येत नसल्याने जिल्ह्यात दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजण्याची शक्यता आहे.

## थोडक्यात

### आषाढी यात्रेसाठी राज्य प.महामंडळाकडून ५ हजार २०० विशेष बसेस सोडणार

**अक्षराज : विकास सरवळे**



**दि.११, पंढरपूर :** आषाढी यात्रेच्या सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी च्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येत असतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून यात्राकाळात ५ हजार २०० विशेष बस सोडण्याचे नियोजन केले असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

आषाढी यात्रा नियोजनासाठी चंद्रभागा बस स्थानक,पंढरपूर येथे एस टी महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर व एसटीचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते. यावेळी परिवहन मंत्री प्रतापसरनाईक म्हणाले, यंदा राज्यातील कोणत्याही गावातून ४० अथवा त्या पेक्षा जास्त भाविक प्रवाशांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना थेट पंढरपूरला जाण्यासाठी त्यांच्या गावातून एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आषाढी एकादशीला राज्यभरातून लाखो भाविक-प्रवाशी पंढरपुरात येतात. अनेक प्रवाशी स्वत:च्या खाजगी वाहनाने, रेल्वेने, एसटीने अथवा विविध पालखींबरोबर चालत दिंडीने येतात या प्रवाशांना एसटीने यंदापासून थेट गाव ते पंढरपूर अशी बस सेवा उपलब्ध करून दिली आहे. या प्रवासात देखील ७५ वर्षावरील ज्येष्ठांना मोफत प्रवास देणारी अमृत ज्येष्ठ नागरिक योजना, महिलांसाठी ५० टक्के तिकीट दरात सुट देणारी महिला सन्मान योजना यासारख्या शासनाने दिलेल्या सर्व सवलती लागू राहणार आहेत. तसेच आषाढी यात्रा काळात लांबच्या पल्याहून एसटी बसेस येत असतात. त्या बस चालकांना व वाहकांना राहण्याची चांगली व्यवस्था करावी त्याचबरोबर त्यांना आंघोळीसाठी गरम पाणी उपलब्ध करून द्यावे. बस स्थानकातून बस प्रवाशांना घेऊन जाण्याअगोदर बसची देखभाल दुरुस्ती करावी. एसटी बसच्या तात्काळ दुरुस्तीसाठी ज्यादा तांत्रिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी अशा सूचनाही परिवहन मंत्री सरनाईक यांनी केल्या.

भाविक-प्रवाशांनी, एसटीच्या सुरक्षित प्रवासी सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी यावेळी केले. तसेच यात्रा काळात पंढरपूर येथे येणाऱ्या सर्व एसटी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या चहा - नाश्ता व जेवणाची मोफत सोय करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष श्री प्रताप सरनाईक यांनी दिली. गतवर्षी वर्षी एसटीने आषाढी यात्रेनिमित्त ५००० विशेष बसेस सोडल्या होत्या. याव्दारे यात्राकाळामध्ये सुमारे २१ लाख, भाविक - प्रवाशांची सुखरूप ने-आन एसटीने केली होती अशी माहिती राज्य परिवहन महामंडळाचे अधिकाऱ्यांनी यावेळी दिली.

**यात्रा कालावधीत चार तात्पूरती बस स्थानके उभारणार**

पंढरपूर यात्रेसाठी राज्यभरातील लाखो भाविकांसाठी विविध विभागांतून गाड्या सोडण्यात येणार आहेत. वारकरी, भाविक तसेच पर्यटकांची होणारी गर्दी पाहता एकाच स्थानकावर गर्दी होऊ नये यासाठी प्रवाशांच्या सोयीसाठीयात्रा कालावधीत पंढरपूर येथे चंद्रभागा, भिमा, पांडुरंग (आयटीआय कॉलेज) व विठ्ठल कारखाना यात्रा स्थानक अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. दरम्यान, यात्रा काळात बसस्थानकावर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आदी सोयी-सुविधा पुरविण्यात येणार आहेत.

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा खामगाव (जि.बुलढाणा) दौरा



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, बुलडाणा :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे गुरुवार, दिनांक १२ जून २०२५ रोजी खामगाव जिल्हा बुलडाणा दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे : गुरुवार दिनांक १२ जून रोजी दुपारी ४.४५ वाजता अकोला येथून शासकीय विश्रामगृह, खामगाव येथे आगमन व नागरिक, कार्यकत्यांच्या भेटीसाठी राखीव. सायंकाळी ६ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर परिषद मैदान, खामगाव जि.बुलढाणा येथे आगमन व कार्यकर्ता मेळावास उपस्थिती. रात्री ८ वाजता देवजी खिमजी मंगल कार्यालय, खामगाव जि. बुलढाणा येथे आगमन व पत्रकार परिषदसाठी उपस्थिती. रात्री ८.४५ वाजता राखीव. त्यानंतर सोईनुसार शेगाव जि. बुलडाण्याकडे प्रयाण व मुक्काम.

### पालकमंत्री मकरंद पाटील यांचा जिल्हा दौरा



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, बुलडाणा :** राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील हे दिनांक ११ व १२ जून २०२५ रोजी बुलडाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार बुधवार, दि. ११ जून रोजी मुंबई येथून शासकीय विश्रामगृह, बुलडाणा येथे सोईनुसार आगमन व राखीव. गुरुवार, दिनांक १२ जून रोजी दुपारी १ ते २ वाजेपर्यंत शासकीय विश्रामगृह येथे अभ्यांगतांसाठी राखीव. सोईनुसार दुपारी बुलडाणा येथून खामगावकडे प्रयाण व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या कार्यक्रमास उपस्थिती. त्यानंतर सोईनुसार पुण्याकडे रवाना होतील.

## संपादकीय

### साने गुरुजी

भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची पुण्यतिथी. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमंळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कादंबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. कॉंग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले.

**साने गुरुजींना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन.**

# मुंबईची 'लाईफलाईन' कि 'डेथ लाईन' ?

**अनंत बोरसे**
**शहापूर, ठाणे९१५८४१५०३७**







आठवड्याची सुरवात होत असतांना मुंबई परिसरातील लाखो प्रवाशी नोकरी व्यवसायानिमित्त लोकल प्रवासाला निघाले मात्र दुर्दैवाने यातील चौदा जण रेल्वे ट्रॅकवर पडले आणि पाच प्रवाशांसाठी तो आयुष्याचाच अखेरचा प्रवास ठरला तर काहींना या प्रवासाने आयुष्यभरासाठीचे जायबंदी केले. मुंबईत रोजगार, उद्योगधंदे, नोकरी, व्यवसाय, शिक्षण तसेच इतर अनेक कारणांमुळे आजुबाजुच्या परिसरातील जनतेला जलद आणि किफायतशीर प्रवास म्हणून लोकलवरच अवलंबून रहावे लागते, आणि प्रवास हा अपरिहार्यच ठरतो,सध्या बारा आणि काही प्रमाणात पंधरा डब्यांच्या लोकल ट्रेन धावत आहेत, आणि एका ट्रेन मधे ८००-९०० प्रवासी क्षमता असतांना जवळपास तीन-चार हजार प्रवासी गुराढोरांप्रमाणे प्रवास करीत आहेत, काही वर्षांपूर्वी मध्य आणि पश्चिम रेल्वेने लोकलच्या फेऱ्या वाढविणे शक्य नसल्याने प्रवासी क्षमता वाढावी म्हणून पंधरा डब्यांच्या लोकल चालविण्यास सुरवात केली, मात्र आजमितीस मध्य रेल्वेच्या मेन लाईन तसेच पश्चिम रेल्वेवर ठराविक लोकल फेऱ्या होत आहे, त्यादेखील कल्याण तसेच विरार पर्यंत आहेत. आजमितीस कल्याण पुढे शहापूर, टिटवाळा, बदलापूर, वसई, विरार, या भागातील प्रवासी संख्या वाढली आहे, आणि गर्दीमुळे प्रवास करणे जिकरीचे झाले आहे, अनेकदा गर्दी मुळे प्रवाशांमध्ये हाणामारी होते, गर्दीमुळे स्थानकांवर चेंगराचेंगरी, लोकलमधून पडुन अपघात सातत्याने होत आहे आणि प्रवाशांचे जीव जात आहे काहींना कायमचे अपंगत्व येत आहे. भरीस भर म्हणून कधी तांत्रिक बिघाड, इंजिन फेल,आगाऊ सुचना न देता घेतला जाणारा ब्लॉक, अशा विविध कारणांमुळे रेल्वे सेवा विस्कळीत होते, तासनतास प्रवाशांना लोकल मधे वा स्थानकांवर खोळंबुन रहावे लागते विशेष म्हणजे या काळात रेल्वे प्रशासन प्रवाशांना योग्य सुचना देत नाही ही प्रवाशांची नेहमीची तक्रार असते, प्रवाशांच्या सहनशीलतेचा उद्रेक झाला कि प्रवाशांना दोष दिला जातो आणि कारवाई बडगा उगारला जातो,रोज मरे त्याला कोण रडे असा रेल्वेचा कारभार, प्रवाशी तरी किती संयम बाळगणार?. रेल्वेचा आपला स्वतंत्र अर्थ संकल्प होता मात्र मोदी सरकारच्या काळात तो मुख्य अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आला.

दिवसेंदिवस लोकलच्या तीनही मार्गावरील प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. कुठल्याही मार्गावरील लोकल प्रवास सुरक्षित राहिलेला नाही.

आज खरी गरज आहे ती साधारण लोकल फेऱ्यांची संख्या वाढविण्याची. त्याच बरोबर मध्य रेल्वेच्या कल्याण पुढील मार्गावर अतिरिक्त रेल्वे मार्गिका वाढवण्याची. गेल्या कित्येक वर्षांपासून कल्याण आसनगाव,कसारा तिसऱ्या मार्गिकेचे काम सुरू आहे त्याच बरोबर कल्याण -बदलापूर दरम्यान अतिरिक्त मार्गिकेचे काम अजुनही पुर्ण होऊ शकले नाही. पनवेल - कर्जत मार्गिकेच्या दुहेरीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे मात्र या मार्गावर लोकल सेवा सुरू झालेली नाही. प्रवाशांची वाढती गरज लक्षात घेता मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या लोकल पंधरा डब्यांच्या करण्याचे ठरले होते मात्र दोन्ही मार्गावर पंधरा डब्यांच्या लोकल फेऱ्या अतिशय अल्प होत आहे.२०१७ पासुन एसी लोकलचे खुळ रेल्वे प्रशासनाच्या डोक्यात घुसले आणि २०१७ पासुन प्रथम पश्चिम रेल्वेवर आणि कालांतराने मध्य रेल्वेच्या मुख्य लाईन वर एसी लोकलचा प्रवास सुरू झाला, काही वर्षांपूर्वी हार्बर मार्गावर देखील एसी लोकल चालविण्याचा प्रयत्न झाला कालांतराने तो रद्द करण्यात आला. एसी लोकलचा अट्टाहास नेमका कोणासाठी रेटुन नेला जात आहे हा प्रश्नच आहे. १०-२०% प्रवाशांना एसी प्रवास हवा असला तरी दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांना एसी चे भाडे पडणारे नाही,मात्र तरी देखील एसी लोकलच्या फेऱ्या वाढविल्या जात आहे याचीच परिणिती सामान्य लोकलच्या गर्दीमधे वाढ होण्यात होते आणि गर्दीमुळे अपघात घडतात. मेल एक्स्प्रेस, सारख्या लांबच्या गाड्यांमधील सर्व साधारण आणि दुसरा स्लिपर वर्गाचे डबे कमी करुन एसी चे डबे वाढवुन प्रवाशांच्या माथी नाहक महागडा प्रवास लादला जात आहे त्यामुळे अनेकदा एसी चे डबे पुर्ण क्षमतेने धावत नाहीत तर दुसरीकडे स्लिपर डब्यांमधे पाय ठेवायला देखील जागा रहात नाही मात्र कश्या ही परिस्थिती प्रवास करणे जनतेला भाग पडते. कोरोना काळात वरिष्ठ नागरिकांची सवलत बंद केली ती अजुनही सुरू करण्यात आली आहे. आज गरज आहे ती जनरल, स्लिपर क्लास डब्यांची अधिक संख्या असलेल्या गाड्यांची, ज्याचे भाडे सामान्य जनतेला परवडु शकते. एसी लोकलचा अट्टाहास ना कोणी प्रवाशांनी धरला होता ना कोणत्या प्रवाशी संघटनांनी मागणी केली होती. एसी लोकलचा चालवाव्यात मात्र रेल्वे प्रशासन साधारण लोकलच्या फेऱ्या रद्द करून त्याऐवजी एसी लोकल चालविण्याचा अट्टाहास धरते त्यामुळे अनेकदा रेल्वे प्रवाशांचा ऊद्रेक होत आहे. दररोज प्रवास करणाऱ्या सामान्य प्रवाशाला, चाकरमान्यांना एसी प्रवासाचे भाडे परवडणे शक्यच नाही त्यामुळेच साधारण लोकलमधे जीव धोक्यात घालून प्रवाशांना प्रवास करावा लागतो आणि त्याची परिणती अशा अपघातात होते. एखादा अपघात झाला कि मगरीचे आसु ढाळले जातात, आर्थिक मदतीची घोषणा होते, सहानुभूतीचा पुर येतो, रेल्वे प्रशासन, शासन-प्रशासन अनेक दावे प्रतिदावे करते मात्र प्रवाशांच्या नशीबी जिवघेणा प्रवासच येतो. कल्याण पुढील कसारा मार्गावरील प्रवाशांचे दूखणे वेगळेच आहे, अगोदरच लोकल फेऱ्यांची संख्या कमी त्यादेखील वेळेवर चालविल्या जात नाही लोकल स्थानकावर ऊभी ठेवून मेल एक्स्प्रेस गाड्या पुढे काढल्या जातात हे तर रोजचेच झाले आहे, प्रवाशांनी संयम तरी किती बाळगायचा?. मोठ्याप्रमाणावर वाहतुकीचे कारण देऊन लोकल फेऱ्या वाढविता येत नसल्याचे रडगाणे नेहमीच गायले जाते मात्र त्याच वेळी वंदे भारत ट्रेन, ईतर मेल एक्स्प्रेस गाड्या सोडल्या जातात याचा अर्थ प्रवाशांनी कसा काढायचा?.. रेल्वे प्रवाशांनी प्रतिक्रिया दिली एखादे आंदोलन केले तर त्यांच्यावरच गुन्हा दाखल केला जातो आणि त्यांनाच गुन्हेगार ठरवले जाते,आणि दोष प्रवाशांनाच दिला जातो.

मुंबई परिसरातुन रेल्वेला सर्वाधिक महसुल मिळतो मात्र त्या प्रमाणात सोयीसुविधा दिल्या जात नाहीत आणि याबाबत ना शासन प्रशासन गंभीर ना रेल्वे गंभीर. लोकप्रतिनिधी निवडून येण्यापुरते हात जोडतात आणि नंतर हात दाखवतात. अनेक रेल्वे प्रवासी, प्रवासी संघटना आपापल्या परीने प्रयत्न करतात मात्र रेल्वे प्रशासन त्यांना गांभीर्याने घेत नाही. चमकोगिरी करत कोणी फलाटाची उंची मोजतो तर कोणी पहाणी दौरे करतो आणि निवडणूक काळात केवळ आश्वासने देतो. किती काळ प्रवाशांना गृहित धरले जाणार आणि रेल्वे प्रशासन आपली मनमानी करत रहाणार? वास्तविक ज्या प्रवाशांमुळे रेल्वे चालते त्या प्रवाशांच्या गरजा लक्षात घेऊन रेल्वेने प्रवाशीभिमुख निर्णय घेणे गरजेचे आहे मात्र नेमके तेच होत नाही.

## *अनाकलनिय*

ही साद ओळखिची
हा नाद ओळखिचा
तो संवाद अंतरिचा
कळलाच नाही

सहवास प्राक्तनाने
हृदयास मिळाला
ऋणानुबंध जुळला
कळलाच नाही

प्रतिसाद प्रमादांना
अलगद दिला मी
विवाद टाळू कैसा
कळलाच नाही

होते सुखात सर्व
कित्येक संगतीला
दु:खात थवा उडाला
कळलाच नाही

का पाठलाग हा
त्या मृगजळाचा
अंत क्षितिजाचा
कळलाच नाही

**- चांगो तुकाराम सरोदे**
**शिक्षक (जि.प.प्राथमिक शाळा**
**पिंप्री गवळी जि. बुलढाणा)**
**मो.नं.९६२३९४३४१८**

## वाचक पत्र



### सर्वच लोकल गाड्या वातानुकूलित करण्याची घाई नको !

मुंब्रा या ठिकाणी झालेल्या अपघाताची दखल घेत राज्य सरकारने भाडेवाढ न करता सर्वच लोकलगाड्या वातानुकूलित करण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच केली. याबाबत केंद्रीय रेल्वे मंत्र्यांशीही बोलणे झाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. मुंबई ठाण्यातील रेल्वे मार्गावर सध्या काही प्रमाणात वातानुकूलित लोकल गाड्या धावत आहेत ज्या कधीही त्यांच्या नियोजित वेळेत रेल्वे स्थानकांवर येत नाहीत याचा अनुभव चाकरमानी प्रतिदिन घेत आहेत. ट्रेनमधील वातानूकुलीन यंत्रांचे दारात गळणारे पाणी, गर्दीच्या वेळेत स्वयंचलित उघड बंद होणाऱ्या दरवाजांना लागणारा अधिकचा कालावधी यामुळे या गाड्यांच्या वेळापत्रकावर प्रतिदिन परिणाम होत असतो ज्यामुळे रोजच काही गाड्या रद्द कराव्या लागतात तर काही वेळा नेहमीच्या धावणाऱ्या लोकल गाड्यांवर त्याचा परिणाम होतो. आजमितीला वातानुकूलित रेल्वेगाड्यांचे तिकीट दर भरमसाठ असल्यामुळे या गाड्यांनी प्रवास करणाऱ्यांची संख्या तुलनेने अल्प असताना इतक्या समस्या येत आहेत तर भविष्यात नेहमीच्या तिकीट दरात सर्वच गाड्या वातानुकूलित केल्या तर लोकल ट्रेनने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या पाहता केवढी भीषण परिस्थिती उद्भवेल याची कल्पनाही करता येत नाही. लोकल ट्रेन वाहतुकीवर होणारा परिणाम लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांनी खासगी कंपन्यांना कार्यालयीन कामकाजाच्या वेळा बदलण्याचे आणि शक्य त्या ठिकाणी वर्क फ्रॉम होम धोरण अवलंबण्याचे आवाहन केले आहे, जे नक्कीच स्वागतार्ह आहे. या आवाहनाला जोपर्यंत सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही आणि लोकल गाड्यांतील प्रवाशांचा भार जोपर्यंत कमी होत नाही तोपर्यंत सर्व गाड्या वातानुकूलित करण्याची घाई करू नये !

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

### स्वयंचलित दरवाजे, गर्दीवर उपाय नव्हे ?

रेल्वे दुर्घटनेनंतर खळबळजनक वक्तव्य केली जातात. रोग कोणता आहे याचे निदान न करता उपचाराची घोषणा होते.जवळपास २००३ पासून रेल्वे प्रशासन दर रविवारी रेल्वेमार्गावर मेगा ब्लॉक घेत आहे. प्रवासाची वाहन साधने बस, मेट्रो रेल्वे, मोनो रेल, टॅक्सी, रिक्षा शिवाय खाजगी वाहने.मुंबईतील लोकसंख्या एक कोटी चाळीस लाखाहून अधिक, रेल्वेचे दररोजचे प्रवाशी सत्तर लाखांहून अधिक, बेस्ट बसचे प्रवाशी पंचेचाळीस लाख, बाहेरून मुंबई दररोज कामधंदा निमित्त येणारे प्रवाशी वेगळे.या सार्या प्रवाशांची वाहतूक करणारी प्राधिकरणे आहेत. नुकत्याच झालेल्या मुंब्रा रेल्वे स्थानकातील अपघातात निष्पपाप प्रवाशांचे प्राण गेले. दररोज दरवाजातून लटकून प्रवास करणार्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. एका लोकल डब्यातील आसन व्यवस्था ९० च्या आसपास पण प्रत्यक्षात डब्यातून गर्दीत हजारच्या आसपास तेथे स्वयंचलित दरवाज्यांची काय कथा. दरवाजे बसवले तर अर्धा प्रवाशांच्या नोकरीवर गदा येईल. त्यांना नोकरीवर वेळेवर पोहचता येणार नाही. केबिनमध्ये बसून निर्णय घेण्यापेक्षा फिल्डवर जाऊ वस्तुस्थितीवर उपाय योजना करा. मेट्रो रेल्वेचे स्वयंचलित दरवाजे मर्यादित प्रवास आणि मर्यादित प्रवासी असल्यामुळेच शक्य आहे. रेल्वे गाड्यांची संख्या वाढवा, लांब पल्ल्याच्या लोकल वाढवा. एसी लोकल संख्या कमी करा.गर्दी असलेली रेल्वे स्थानके नियंत्रणात आणा.सुरक्षा व्यवस्था चोख ठेवा. मध्य रेल्वेमार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, यखळा, करी रोड, परेल, दादर, कुर्ला, घाटकोपर, भांडुप, मुलुंड, ठाणे, दिवा, डोंबिवली,कल्याण, टिटवाळा,आसनगाव, कसारा, अंबरनाथ, बदलापूर, कर्जत, खोपोली तर पश्चिम रेल्वेमार्गावरील चर्चगेट, मरीन लाईन, मुंबई सेंट्रल, एल्फिन्स्टन, दादर, वांद्रे, सांताक्रूझ, अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव, मालाड, बोरिवली, वसई, भाईंदर, नालासोपारा, विरार इत्यादी ठिकाणी रेल्वे स्थानकावर विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे. तेव्हाच रेल्वे प्रवाशांचा प्रवास निर्धास्त होईल. स्वयंचलित दरवाजे बसवून अपघात कमी होणार नाहीत गर्दीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले तर अपघात टाळता येतील.

**- महादेव गोळवसकर**
**कुर्ला (मुंबई)९८६९४७६२०९**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मोहर्ली वनपरिक्षेत्रात वटपोर्णिमा निमित्य महिला वनरक्षकांचे वट वृक्षांचे वृक्षारोपण

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११ चंद्रपूर :** मोहर्ली वनपरिक्षेत्रातील महिला वनरक्षक कु. आरती आईटलावार, वनरक्षक मोहर्ली- १ यांच्या पुढाकाराने महिला वनरक्षक कु. सुमैया सिद्धिकी, वनरक्षक देवाडा, कु. टीना काळे, वनरक्षक पद्मापूर-१, शितल चौधरी, वनरक्षक पद्मापूर- २, कु. माया बुरडकर, वनरक्षक चिचोली, संजय जुमडे, क्षेत्र सहाय्यक मोहर्ली, सुरेंद्र मंगाम, वनरक्षक सितारामपेठ, विखुल जनबंधू, वनरक्षक मुधोली यांनी मोहर्ली वनपरिक्षेत्र कार्यालय परिसरात वटसावित्रीच्या निमित्ताने वट वृक्षाची लागवड करून जतन व संगोपन करण्याचा निर्धार केला. वनपरिक्षेत्र कार्यालयाच्या परिसरात ५० वृक्षांची लागवड करण्यात आली. वट वृक्षाचे महत्व यावर सविस्तर माहिती संतोष थिपे वनपरिक्षेत्र अधिकारी मोहर्ली (प्रादे.) यांच्या वतीने देण्यात आली.



## दौलत हरड यांचे आकस्मिक निधन

**अक्षराज : सुनिल फर्डे**



**दि.११, शहापूर (ठाणे) :** खरीवली(सो) गावातील सम ाजसेवी व्यक्ती म्हणून सुपरिचित असलेले दौलत बालकृष्ण हरड यांचे हृदयविकाराच्या झटक्याने आकस्मित निधन झाले. ते किन्हवली विभागातील एक नामवंत मेकॅनिक होते. घड्याळ व टीव्ही रिपेरिंग करता करता परिसरातील नागरिकांना अडीअडचणीत मदत करणारे दिलदार माणूस दौलत हरड यांच्या रूपाने अनंतात विलीन झाले. त्यांच्या पश्चात एक उच्च शिक्षक मुलगी आई पत्नी भाऊ बहीण पुतणे असा मोठा परिवार आहे. १७ जून रोजी खरिवली गावात त्यांच्या शोक सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

## पांडुरंग कृष्णा मुंडे यांचे दुःखद निधन

**अक्षराज : विनोद वास्कर**



**दि.११, दिवा (ठाणे) :** आगासन गाव येथील शांत, सरळ व्यक्तिमत्व असणारे पांडुरंग कृष्णा मुंडे यांचे बुधवारी ११ जून २०२५ रोजी अल्प आजाराने दुःखद निधन झाले . त्यांच्या पश्चात पत्नी सीताबाई पांडुरंग मुंडे, मुले चिंतामण, उदय, प्रदीप, बहिणी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

नेहमीच शांत स्वभाव असणारे , तसेच सर्वांशी आपुलकीने वागणारे पांडुरंग यांचे व्यक्तिमत्व होते. त्यांच्या जाण्याने मुंडे परिवार व आगासन ग्रामस्थांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृत्यू समयी त्यांचे वय ८५ वर्षे होते.

आगासन येथील समश्यानभूमीत बुधवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या प्रमाणात मुंडे कुटुंबीय, व नातेवाईक उपस्थित होते.

त्यांचा दशक्रिया विधी दिनांक २० जून रोजी आगासन येथील गणेश घाट येथे होणार असून उत्तरकार्य तेरावा विधी दिनांक २३ जून रोजी मुक्काम आगासन पोस्ट दिवा ,तालुका जिल्हा ठाणे येथील राहत्या घरी होणार असल्याचे त्यांच्या कुटुंबियांकडून सांगण्यात आले आहे.

## मनपा महिलांनी वटवृक्षाचे रोप लावून साजरी केली वटपौर्णिमा



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.११, नवी मुंबई :** जागतिक पर्यावरण दिनापासून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध पर्यावरणशील उपक्रमांचे सातत्यपूर्ण आयोजन करण्यात येत असून आज वटपौर्णिमा सणाच्या निमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयाबाहेर अधिकारी कर्मचारी महिलांनी वडाचे वृक्षारोपण करुन पर्यावरण संवर्धनाचा आगळावेगळा संदेश दिला. यामध्ये उद्यान विभागाच्या परिमंडळ २ उपआयुक्त नयना ससाणे, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, शिक्षण विभागाच्या उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे, आपत्कालीन व्यवस्थापन विभागाच्या उपआयुक्त ललिता बाबर, उपआयुक्त स्मिता काळे, सहा. आयुक्त अनुराधा बाबर, स्वरूपा परळीकर, अलका महापूरकर आणि महिला अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वडाचे झाड हे दीर्घायुष्याचे व स्थिरतेचे प्रतिक मानले जात असून म हानगरपालिकेच्या महिला अधिकारी, कर्मचारी यांनी वटपौर्णिमेच्या सणाचे धार्मिक व्रतपालन करतानाच पर्यावरणशील दृष्टीकोन जपत वडाच्या लागवडीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही दिला. आपण केवळ एक झाड लावत नाही तर भावी पिढ्यांसाठी शुध्द पर्यावरणाची रुजवात करत आहोत अशा भावना यावेळी महिलांनी व्यक्त केल्या. याप्रसंगी उद्यान विभागाचे परिमंडळ १ उपआयुक्त किसनराव पलांडे व उद्यान अधिक्षक भालचंद्र गवळी व इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

अशाच प्रकारे वडाच्या वृक्षारोपणाचा अभिनव उपक्रम सेक्टर १ सीबीडी बेलापूर येथील मँगो गार्डन मध्ये उद्यान व समाजविकास विभागाच्या वतीने राबविण्यात आला. याप्रसंगी समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे यांच्यासह उद्यान अधिक्षक प्रकाश गिरी, समाज सेवा अधिकारी प्रकाश कांबळे तसेच महिला बचत गटाच्या सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# उदगीर ते देगलूर रस्त्याकडे प्रशासनाचे प्रचंड दुर्लक्ष...

### ♦ प्रवाशांची हेळसांड कोण थांबवणार?



**अक्षराजः अशोक लोणीकर**

**दि.११, मुखेड (नांदेड) :** रेणापुर निझामाबाद हा तेलंगणा कर्नाटक राज्याला जोडणारा महत्वाचा राष्ट्रीय महामार्ग असुन निझामाबादपासून उदगीरला आणि उदगीरपासून निझाम ाबादला अनेक व्यापारी, नोकरदार व कामगार आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी दररोज प्रवास करीत असतात.

उदगीर, मुक्रमाबाद, देगलूर आणि निजामाबाद ही मोठी बाजारपेठ असलेली शहरे आहेत. देगलूर तालुक्यातील मौजे 'होट्टल' येथे प्राचीन कालीन शिल्प असल्यामुळे महाराष्ट्रातील अनेक पर्यटक उदगीर, मुक्रमाबाद मार्गेच होट्टलला जातात. उदगीर ते टाकळीपासून एकदम चांगला रस्ता आहे. परंतु नांदेड जिल्ह्याची हद्द सुरू झाली की, एक पदरी रस्त्यामुळे प्रवाशांना आपला जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. अरूंद रस्ता, जागोजागी खड्डे, प्रचंड चिखल, रस्त्यावर पाऊस आणि वादळामुळे पडलेले झाडे आणि वाढलेल्या झाडांच्या फांद्या, आजूबाजूला दोन्हीही बाजुनी वाढलेले झाडे, देगलूर, करडखेड, गोजेगाव, मुक्रमाबाद येथे रस्त्यावर लोकांची गर्दी, व रोडच्या दोन्हीही बाजुनी बेशिस्तपणे लावलेली दुकाकी वाहने, रस्त्यावर झोपलेले कुत्रे, थांबलेली जनावरे यामुळे वाहन चालकांना वाहन चालवताना प्रचंड कसरत करावी लागते व प्रवाशांची अक्षरक्षः दमछाक होते. अपघातांना सामोरे जावे लागते. अनेक कालव्यांवर पूल बांधलेले नाहीत.

त्यामुळे उदगीर तालुक्यातील धडकनाळ, मुक्रमाबाद जवळील लखमापूरहून येणारा कालवा, म रजवाडी पाटीजवळील व ईटग्याळ जवळील कालव्यावर पाणी वाहताना तिथेच प्रवाशांना तासनतास पावसात भिजत नाईलाजास्तव थांबावे लागते. ही प्रवाशांची वाताहत, होणारा त्रास प्रशासन कधी थांबवेल अशी जोरदार चर्चा चालू आहे. जनतेच्या मतावर निवडून गेलेले मुखेड, देगलूरच्या लोक प्रतिनिधींना 'उघडा डोळे आणि पहा नीट' अशी म्हणण्याची वेळ आली आहे. प्रवाशांची होणारी हेळसांड आणि त्रासांची किव प्रशासन आणि लोकप्रतिनिधिंना कधी येईल का ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रेल्वेचा ठाणे-कल्याण मार्ग बनतोय मृत्यूचा सापळा...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.११, ठाणे :** नुकत्याच मुंब्रा रेल्वे स्थानका जवळील रेल्वे अपघातात लोकलमधून पडल्याने चार प्रवाशांचे हकनाक बळी गेले तर ९ जण गंभीर जखमी झाले आहेत. याच अपघातामुळे रेल्वेमुळे जाणाऱ्या बळींचा मुद्दा आता पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. रेल्वे लोकलमध्ये नागरीकरणाच्या प्रम णात जशी गर्दी वाढू लागली आहे. त्याच प्रमाणात अपघातांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढू लागली असून रेल्वे प्रवास जीवघेणा ठरू लागला आहे. गेल्या दशकात रेल्वे अपघातात मध्य रेल्वेवर २००९ ते जून २०२४ दरम्यान २९,३११ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. गेल्या दोन वर्षांत सर्वाधिक मृत्यूची नोंद असणाऱ्या स्थानकांमध्ये कल्याण, ठाणे यांचा समावेश आहे.

२०२४ मध्ये कल्याण रेल्वे पोलिस ठाण्याच्या हद्दीत ११६ जणांचा रेल्वे अपघातात मृत्यू झाला. ठाणे रेल्वे पोलिस ठाण्याचा हद्दीत २०२४ मध्ये १५१ जणांचा मृत्यू झाला असल्याचे आकडेवारी सांगते. मध्य रेल्वेवर दररोज १८१० उपनगरीय लोकल सेवा चालवल्या जातात. ज्यातून ४० ते ५० लाख प्रवाशांची वाहतूक दररोज होते. गेल्या काही वर्षात रेल्वे प्रवाशांची गर्दी प्रचंड वाढलेली असताना गर्दीच्या काळात होणाऱ्या अपघातांचे प्रमाण फार मोठे आहे.



ठाणे स्थानकादरम्यान कळवा खाडी परिसरात रेल्वेरुळ ओलांडताना आणी रेल्वेतून खाडीत पडून प्रवाशांचे रेल्वे अपघात अधिक होतात.वाढत्या शहरी क रणामुळे कळवा, मुंब्रा, दिवा, कल्याण ते उल्हासनगर आणि अंबरनाथ, बदलापूर, टिटवाळा येथील प्रवाशांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे.

उपनगरीय मार्गावर दहा वर्षात घडलेल्या विविध अपघातांमध्ये तब्बल २७ हजार ३१२ प्रवाशांना आपला जीव गमवावा लागल्याचे तसेच १७ हजार ३२५ प्रवाशांना जखमी व्हावे लागल्याची धक्कादायक गोष्ट दोन वर्षांपूर्वी माहितीच्या अधिकारात उघडकीस आली होती. ही आकडेवारी २०१० ते ऑक्टोबर २०१९ दरम्यानची होती. दररोज किमान ८ ते १० बळी जात आहेत. यातही २०१६ ते १९ या तीन वर्षांत किमान ८ हजार ६४० बळी गेले आहेत. हे बळी रेल्वे रुळ ओलंडताना, चालत्या लोकलमधून खांबाला धडकून, फलाट आणि लोकलच्या गॅपमध्ये अडकून, विद्युत तारेचा झटका लागून गेले आहेत.

**गर्दी नियंत्रणाचा दावा फोल !**

विशेष करून सकाळच्या वेळी कामावर जाताना आणि संध्याकाळच्या वेळी घरी परतण्यासाठी प्रवाशांची मोठी गर्दी लोकलमधे होत असते. त्या दरम्यान दरवाजात उभे रहाणाऱ्यांची संख्या प्रचंड असते. त्यामुळे खाली पडणाऱ्या प्रवाशांची संख्याही वाढली आहे. दोन वर्षांपूर्वी पाचवा, सहावा रेल्वे ट्रॅक सुरु झाला आहे. त्यामुळे लांब पल्ल्याच्या गाड्यांना स्वतंत्र मार्गिका उपलब्ध झाली आहे. पूर्वी उपनगरीय रेल्वे लोकलच्या १ हजार ७७४ फ ेऱ्या होत होत्या त्यात वाढ होऊन १ हजार ८११ करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे या फेऱ्या गर्दीच्या वेळेत वाढवण्यात आल्या आहेत.

# केज शहराला बायपास/रिंग रोड मंजुरीसाठी १३ जून रोजी रस्ता रोको

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.११, केज :** केज शहर हे खाम गाव-पंढरपूर व अहमदपूर-अहमदनगर या महामार्गाच्या जोडणीवर असलेले शहर आहे. वरील दोन्ही महामार्ग झाल्यानंतर आता केज शहरातील भागात वाहतूक व रहदारीचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यातच वरील दोन्ही महामार्ग केज च्या आंतरिक भागात भवानी चौक ते श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (चौक) या भागात एकत्र येत असल्याने या भागात एकत्रित वाहतुकीचा भार वाढला आहे. हा रस्ता बनवताना महाराष्ट्र रस्ते विकास मंडळाकडे केज विकास संघर्ष समि तीने धारूर चौक ते श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकापर्यंत दोन्ही बाजुने किमान दोन मीटर रस्ता वाढवून बनवावा यासाठी आंदोलनाद्वारे मागणी केली होती मात्र लेखी आश्वासन देऊनही त्याची पूर्तता संबंधित यंत्रणेने केलेली नाही. तसेच बनवलेल्या रस्त्यावर नालीकाम मूळ जुन्या नालीवर न घेतल्याने नवीन नाली रस्त्याकडील बाजूने आल्याने रस्त्याची रुंदी कमी होऊन वाहनांना तात्पुरती पार्किंग देखील रस्त्यावर करावी लागत आहे.



रस्त्यावर होणारी वाहनांची पार्किंग, धावणारी वाहने यामुळे विद्यार्थी, महिला व वृद्धांना या रस्त्यावरून प्रवास करणे अत्यंत अवघड बनले आहे. आणीबाणीच्या काळात अंबुलन्स (रुग्णवाहिका) व पोलिस वाहनांना देखील येथून रस्ता काढण्यासाठी कसरत करावी लागते. या भागात वाहतुकीसाठी फक्त एक ट्रॅक रस्ता उपलब्ध असतो ज्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. सुविधा झाल्याने या दोन्ही महामार्गावर धावणाऱ्या अवजड वाहनांची संख्या व गतीही वाढली आहे. परिणामतः केज शहरातील या अंतर्गत भागातील रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढून केजच्या अनेक युवक-नागरिकांना जीव गमवावा लागलेला आहे.

ही समस्या सोडवण्यासाठी आता केजच्या नागरिकांना विश्वासात घेऊन केज शहराला बाह्य भागातून पर्यायी बायपास/ रिंगरोड किंवा उड्डाण पूल यापैकी जे सोयीचे व उपयोगी असेल ते तात्काळ मंजूर करणे खूप आवश्यक आहे. बाह्य रस्ता केल्यास तो रिंगरोड स्वरूपात असणे गरजेचे आहे. दोन महामार्ग जोडणारा बायपास रिंगरोड स्वरूपात असणे आहे. केवळ एका बाजूने बायपास केल्यास ही समस्या पुन्हा कायम राहू शकते.

ही बाब तात्काळ न केल्यास येत्या कांही दिवसात भवानी चौक ते श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक या भागातील रस्त्यावर नागरिकांना प्रवास करणे अत्यंत धोकेदायक व जीवघेणे बनले आहे.

यासाठी केज विकास समिती लवकरच केजच्या आमदार नमिताताई मुंदडा व बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या भेटी घेऊन निवेदनाद्वारे यासाठी लक्ष देण्याची विनंती करणार आहे.

प्रशासकीय स्तरावर या मागणीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी समिती येत्या शुक्रवार दि. १३ जून २०२५ रोजी सकाळी ठीक ११-०० वाजता केज बसस्थानकासमोर महामार्गावर 'रास्तारोको' आंदोलन करणार आहे. तरी केज शहर व परिसरातील नागरिकांनी या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन समन्वयक हनुमंत भोसले यांनी केले आहे. निवेदनावर नासेर मुंडे, शेषराव घोरपडे, नारायणराव अंधारे, संपत वाघमारे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# पावसाळ्यातील साथीच्या आजारांपासून सावध रहा – डॉ.मारोती वाकोडे

**अक्षराज : रमेश पंडित**

**दि.११, हिमायतनगर :** मृग नक्षत्राच्या आगम नाने पावसाळ्याची सुरूवात झाली असून हवामानात मोठा बदल झाला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या आजारांविषयी सतर्क राहावे, असे आवाहन हिमायतनगर येथील म नस्वी रुग्णालयाचे संचालक डॉ. मारोती वाकोडे यांनी केले आहे.

डॉ. वाकोडे यांनी सांगितले की, डिसेंबर ते जून या कालावधीत हवामानातील बदलामुळे आजारांना निमंत्रण मिळते. पावसाळ्यात दूषित पाण्यामुळे



चिकनगुनिया, टायफॉईड, कॉलरा यांसारखे आजार पसरतात. विशेषतः लहान मुले आणि वृद्ध हे अधिक असुरक्षित असतात. पावसाळ्यात डासांची उत्पत्ती वाढल्याने विविध विषाणूजन्य आजार लवकर पसरतात. त्यामुळे उघड्यावरचे अन्नपदार्थ टाळावेत, शुद्ध पाणी किंवा उकळलेले पाणीच प्यावे, आणि डासांपासून बचावासाठी योग्य ती काळजी घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच ताप, पोटदुखी, सर्दी-खोकला यासारख्या किरकोळ वाटणाऱ्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता त्वरित वैद्यकीय उपचार घ्यावेत, यामुळे मोठ्या आजारापासून बचाव होतो, असेही त्यांनी सांगितले. वेळेवर उपचार आणि स्वच्छतेची काळजी यामुळेच आपण साथीच्या आजारांपासून सुरक्षित राहू शकतो, असा स्पष्ट संदेश त्यांनी लोकशक्ती च्या माध्यमातून दिला आहे.

# लवकरच नवी मुंबईत सिडकोकडून २२ हजार घरांसाठी लॉटरी

## सर्वसामान्यांचे घराचं स्वप्न होणार साकार...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.११, ठाणे :** विमानतळ आणि वेगाने रस्तेमार्गाचे जाळे विणले जाणाऱ्या नवी मुंबईत सध्याच जागांचे भाव गगनाला भिडले आहेत. यामुळे नवी मुंबईत सर्वसामान्यांना घर विकत घेणे अवघड होऊन बसले आहे. साध्या वन बीएचके घरांची किंमत कोट्यवधींच्या घरात गेली आहे. त्यामुळे नवी मुंबईत चांगल्या परिसरात घर घेणे सामान्य नागरिकांच्या खिशाला परवडणारे नसते. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक सिडकोकडून उपलब्ध होणाऱ्या परवडणाऱ्या घरांकडे डोळे लावून बसलेले असतात. या पार्श्वभूमीवर सिडकोकडून लवकरच नव्या घरांसाठी सोडत काढली जाणार आहे.




जून महिन्याच्या अखेरीस सिडकोकडून नवी मुंबईतील तब्बल २२ हजार घरे विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात येतील.जून महिनाअखेरीस विविध नोडमधील २२ हजार घरे विक्रीसाठी उपलब्ध करण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. बुधवारी होणाऱ्या संचालक मंडळाच्या बैठकीत त्यावर शिक्कामोर्तब केला जाण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे मागील गृहयोजनेतील शिल्लक राहिलेल्या १६ हजार घरांचासुद्धा यात समावेश केला जाणार आहे.

सिडकोने अलीकडेच काढलेल्या २६ हजार घरांच्या विक्री योजनेला विविध कारणांमुळे अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. असे असले तरी सोडतीत यशस्वी ठरलेल्या जवळपास दहा हजार ग्राहकांनी घराचा पहिला हप्ता भरला आहे. हा प्रतिसाद समाधानकारक असल्याचे सिडको प्रशासनाकडून सांगण्यात आले होते.

लवकरच सिडकोच्या घरांची सोडत प्रक्रिया सुरु होण्याची शक्यता आहे. जून महिन्याच्या अखेरीस सिडकोकडून घरांच्या लॉटरीसाठी अर्ज मागवण्याची प्रक्रिया सुरु होईल, असा अंदाज आहे. लॉटरीत जवळपास २२ हजार घरे विक्रीसाठी उपलब्ध करण्याचा सिडकोचा निर्णय. सिडकोच्या संचालक मंडळाची आज बैठक आहे. या बैठकीत सोडत प्रक्रिया कधी सुरु होणार, यावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. सिडकोच्या नव्या सोडतीमधील २२ हजार घरांमध्ये वाशीसह, जुईनगर, खारघर, तळोजा, द्रोणागिरी येथील घरांचा समावेश आहे. अशाप्रकारे दिवाळीपूर्वी ही घरांची सोडत निघाल्यास सर्वसामान्यांसाठी मोठा दिलासा असणार असून या सोडती मुळे तसेंच सर्व सामान्यांचे घराचे स्वन साकार होण्यास देखील मदत होणार हे नक्कीच.

# समाजासाठी निस्वार्थ कार्य करणाऱ्यांना गरुड फाऊंडेशनचे पाठबळ - लंके

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, अहिल्यानगर :** राज्यातील गरुड फाउंडेशनच्या वतीने समाजासाठी कार्य करणाऱ्या विविध व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन जो सन्मान होत आहे तो खरोखरच कौतुकास्पद आहे. निस्वार्थीपणे समाजासाठी कार्य करणारी माणसे असो किंवा संस्था असो त्यांच्या कार्याला हातभार लावला तर त्यांचे कार्य खूप दूरवर पोहचेल म्हणून गरुड फाउंडेशन व महाराष्ट्र राज्य ग्रामीण पत्रकार पुरस्काराच्या माध्यमातून त्यांना पाठबळ देण्याचे कार्य करीत आहे. असे गौरवोद्गार खासदार निलेश लंके यांनी काढत यापुढेही गरुड फाउंडेशने असेच कार्य करत रहावे असे निलेश लंके यांनी गरुड फाउंडेशनचे कौतुक केले.

गरुड फाउंडेशन आणि युवा ग्रामीण पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा नुकताच राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या अण्णासाहेब शिंदे सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात राज्यभरातील विविध क्षेत्रांतील शेकडो मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक, कृषी, पत्रकारिता, क्रीडा, पर्यावरण, अध्यात्म आणि अन्य क्षेत्रांतील शेकडो मान्यवरांना सन्मानचिन्ह व सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गडचिरोली येथील सहाय्यक पोलीस आयुक्त व राहुरीचे भूमिपुत्र संदीप रमेश भांड हे होते. व प्रमुख उपस्थितीत खासदार निलेशजी लंके, माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाध्यक्ष रावसाहेब खेवरे, यशवंत सेना जिल्हाध्यक्ष विजय तमनर, गरुड फाऊंडेशनचे अध्यक्ष आकाश पुजारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामदास बाचकर, पत्रकार संघाचे जिल्हा अध्यक्ष बाळकृष्ण भोसले, सुरक्षा अधिकारी गोरक्षनाथ शेटे, पत्रकार वसंत रांधवण, सरपंच शेखर




चोरघे, सरपंच ज्ञानेश्वर बाचकर, सरपंच अप्पासाहेब, तमनर, ह.भ.प अमोल महाराज पिसे, ह.भ.प प्रेमानंद महाराज शास्त्री सह आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी आपल्या भाषणात पुरस्कार प्राप्त व्यक्तींनी आणखी प्रभावी समाजकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच अशा पुरस्कारांमुळे कार्यकर्त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मिळते आणि पुढील कार्यासाठी प्रेरणाही मिळेल असे त्यांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रमाचे आयोजन गरुड फाउंडेशनचे कार्यकारी अध्यक्ष रमेश खेमनर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी आयोजनासाठी रामचंद्र थोरात, रंगनाथ तमनर, अप्पासाहेब तमनर, पत्रकार अशोक मंडलिक, आर.आर.जाधव, जावेद शेख, सोमनाथ वाघ, कृष्णा गायकवाड, मनोज साळवे, शरद पाचरणे यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आर.आर.जाधव यांनी केले. सूत्रसंचालन अप्पासाहेब ढोकणे यांनी केले, तर आभार अनिल डोलनर यांनी मानले.

# महाडीबीटीच्या माध्यमातून, जनतेची लुट थांबवा - मनसे नेते पवार

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.११, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील जेष्ठ नागरिकांची मोबाईल नंबर ला आधार लिंक म हाडीबीटी च्या नावाने तहसील कार्यालयात नोंदणी करून सुद्धा मोठ्या प्रमाणावर जेष्ठ नागरिकांची संजय गांधी निराधार अनुदान तसेच श्रावणबाळ योजना अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाले नाही. त्यामुळे आर्थिक दृष्ट्या सक्षम नसलेल्या जेष्ठ नागरिकांची वयोवृद्ध महिला ची मोठ्या प्रमाणात हेळसांड होते आहे आणि या अशिक्षीत नागरिकांचा लिहिता वाचता येत नसल्याने याचा फायदा पारनेर तालुक्यातील भामट्या एजंटांनी, तसेच सेतू सुविधांच्या नावाने पारनेर तालुक्यात गावोगावी सुरू असलेल्या केंद्रात मोबाईल



ला आधार लिंक करण्यासाठी २००, ३००, ५०० रुपये घेऊन लुटलं जाते. हे सर्व तहसीलदारांच्या आशिर्वादामुळेच तर चालू नाही ना अव्वाची सव्वा रुपये घेऊन पारनेरमध्ये जेष्ठ नागरिकांना लुटण्याचा काळा धंदा जोरात चालू आहे.

पारनेर तालुक्यात शासन मान्यता प्राप्त आयडी असलेली सेतू सुविधा केंद्र कार्यरत आहेत की नाही असा प्रश्न सर्वसामान्य माणसाला पडला आहे...? माहीतीची सनद सेतू सुविधा केंद्रात मोठ्या ठळक अक्षरात लावने बंधनकारक असतानाही याची गांभीर्याने अंमलबजावणी केली जात नाही आयडी नसताना ही बोगस आधार सुविधा केंद्राच्या माध्यमातून पारनेर तालुक्यात खुलेआम मोठ्या प्रमाणावर गोर गरीब शेतकरी बांधवांना तसेच नवीन रेशन कार्ड, नाव समाविष्ट, ऑनलाईनच्या नावाने शाळकरी मुले, मुली, जेष्ठ नागरिकांची विविध प्रकारच्या दाखल्यासाठी मोठ्या प्रमाणावर लुट चालू असताना तहसीलदार गप्प का...? तहसील प्रशासनाला वेळोवेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पत्रव्यवहार करून या गोष्टी लक्षात आणुन सुद्धां कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात येत नसेल तर हा सेतू सुविधा केंद्राच्या माध्यमातून चाललेला काळा गोरखधंदा राजरोसपणे तहसील कार्यालयाच्या आवारात तसेच पुर्ण तालुक्यात तहसीलदार यांच्या आर्थिक मिलीभगत मुळेच सुरू असल्याचा गंभीर आरोप मनसेच्या माथाडी कामगार सेनेचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष अविनाश पवार यांनी पारनेर तहसीलदार यांचे नाव घेऊन केला. अवैधरीत्या सुरू असलेल्या या सेतु सुविधा केंद्रावर तहसीलदार यांनी कारवाई केली नाही, तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने लवकरच जनतेच्या हक्कासाठी जेष्ठ नागरिकांना सोबत घेऊन पारनेर तहसीलदार कार्यालयात बेमुदत ठिंय्या आंदोलन करणार असल्याचे पवार यांनी बोलताना सांगितले.

# सर्वांना विश्वासात घेऊन निधीचे वाटप करणार : पालकमंत्री डॉ.उईके

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** जिल्हा नियोजन समितीचा निधी हा विकासाच्या कामासाठी उपयोगात आणला जातो. या निधीचे वितरण करताना जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊनच वाटप करण्यात येईल. तसेच जिल्ह्याशी संबंधित सर्व महत्त्वाच्या मुद्यांवर सर्व लोकप्रतिनिधींना घेऊन मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेण्यात येईल, जेणेकरून जिल्ह्यातील सर्व प्रश्न तातडीने मार्गी लागावे, असे राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी सांगितले. नियोजन भवन येथे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

बैठकीला खा.प्रतिभा धानोरकर, खा.डॉ.नामदेव किरसान, आ. तथा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, आ. सुधाकर अडबाले, आ. अभिजित वंजारी, आ. किशोर जोरगेवार, आ. कीर्तीकुमार भांगडीया, आ. करण देवतळे, आ.देवराव भोंगळे, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग, पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, जिल्हा नियोजन अधिकारी संजय कडू तसेच इतर विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सन २०२४-२५ मध्ये सर्वसाधारण योजनेचे ४५६ कोटी, आदिवासी उपयोजनेचे १०३ कोटी, अनुसूचित जाती उपयोजनेचे ७५ कोटी असे एकूण ६३४ कोटी ४२ लक्ष निधी विकास कामांवर खर्च करण्यात आला आहे, असे सांगून पालकमंत्री डॉ.अशोक उईके म्हणाले, आरोग्य हा अतिशय महत्त्वाचा विषय असून जिल्ह्यातील सर्व प्राथमिक केंद्र व उपकेंद्रासाठी निधी दिला जाईल. तसेच अद्यावत सोयी सुविधा या केंद्रामधून देण्यात येईल. त्यासाठी विशेष प्रस्ताव पाठवावा. जिल्ह्यातील अंगणवाड्यांचे बांधकाम आवर्जून पूर्ण करावे. नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रातील अंगणवाड्यांना सुद्धा निधी देण्यात येईल. ग्रामीण भागातील नागरिक योजनांपासून वंचित राहू नये, त्यासाठी जिल्ह्याचा एक चांगला प्रस्ताव तयार करावा. सर्व तालुका स्तरावर क्रीडा विकासासाठी आणि व्यायामशाळांसाठी वाढीव निधीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. कर्मवीर मा.सां. कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासह ग्रामीण भागात औषधींसाठी निधीची कम तरता पडू देणार नाही. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून मृतदेह मोफत घरी नेण्यासाठी शववाहिकांची संख्या वाढवावी. जिल्ह्यातील ‘ब’ आणि ‘क’ दर्जाच्या तीर्थक्षेत्रांना सुध्दा निधी देण्यात येईल. सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊनच या निधीचे वाटप करण्यात येईल, अशी ग्वाही पालकमंत्री डॉ.अशोक उईके यांनी दिली. तसेच आजच्या बैठकीला जे अधिकारी गैरहजर असतील, त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्याच्या सूचना ही त्यांनी दिल्या. यावेळी खासदार आणि आमदारांनीसुद्धा आपापल्या सूचना मांडल्या.

# थोडक्यात

## रस्त्यावर अतिक्रमित वाहनांवर आता होणार कडक कारवाई - भास्करराव शिंदे



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.११, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील रहदारी असलेल्या रस्त्यावर मारवाडी पेठ, तसेच बाजार गल्ली, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयालगत रोड, ग्रामपालिके जवळ व श्रीराम चौक या रस्त्यावरील मोटरसायकलचे व चारचाकी च्या अतिक्रमणात कायम वाढ होत आहे. त्यामुळे छोटे- मोठे अपघात होत असतात. तसेच मोठ्या कर्कश्य आवाजाचे सायलेन्सर बसविणे, मोटरसायकल गर्दीच्या मार्गावरून धूम स्टाईल जोरात चालवणे, अल्पवयीन मुलांच्या हातात मोटरसायकल चालविण्यास देणे, यावर लासलगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे व सहकाऱ्यांच्या पथकाने वेळोवेळी बेशिस्त उभ्या असलेल्या या रस्त्यावरील मोटरसायकल व चारचाकी धारकांना सूचना दिल्या आहेत. तसेच मोटरसायकलच्या टायर मधील हवा सोडून त्यांना जाणीव करून दिली, तरी पण वाहनधारक या गोष्टी विसरून पुन्हा नव्याने हे रस्त्यावर आपली वाहने आडवी-तिडवी उभी करतच असतात. म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांनी वाहनधारकांना अशी सूचना केली आहे की, यापुढे कोणतेही वाहन रस्त्यावर बेशिस्तपणे उभे असल्याचे दिसले तर अशा वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई करून वाहनाचे कागदपत्रे, वाहन चालविण्याचा परवाना, वगैरे ही तपासण्यात येणार आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्याला ४ दिवस पावसाचा यलो अलर्ट; प्रशासनातर्फे दक्षतेचे आवाहन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११,अहिल्यानगर :** जिल्ह्याच्या काही भागांत १० ते १२ जून या कालावधीत विजांच्या कडकडाटासह वादळे, हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊससोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता असून १३ व १४ जून रोजी वादळी वारा, मुसळधार पाऊस आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता हवामान खात्याने शक्यता वर्तवली आहे. जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. नागरिकांनी आवश्यक ती दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. राज्यातील सर्व भागांत १५ जून ला मोसमी पाऊस सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये. १५ जून नंतरच पावसाची मार्गाक्रमण होण्यासाठी सक्रिय वातावरण निर्मिती होण्याची शक्यता आहे, अशी माहिती हवामान विभागाने दिली आहे. विजांच्या गडगडाटासह वादळ होत असताना खुल्या मैदानावर काम करू नये. विजा होताना झाडांच्या खाली आसरा घेऊ नये, विजेची आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे वीजपुरवठा खंडित करून ठेवावीत. ओढा, तलाव, नदी, वीज वहन करणाऱ्या सर्व वस्तूंपासून दूर राहावे, अशा सूचना जिल्हा प्रशासनाने केल्या आहेत.

## निफाडला प्रहारचे अन्नत्याग आंदोलन; विविध मागण्यांसाठी अन्नत्याग आंदोलन



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.११, विंचूर (नाशिक) :** शेतकरी, कष्टकरी, कामगार, दिव्यांग महिला व वंचित घटकांच्या न्याय हक्कासाठी माजी मंत्री बच्चुभाऊ कडू यांनी गुरुकुंज मोझरी येथे दिनांक ०८ जून २०२५ पासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. परंतु शासनाने रास्त मागण्यांबाबत कुठलाही निर्णय व दखल घेतलेली नाही. त्यासाठी प्रहार दिव्यांग क्रांती संघटना व प्रहार युवा आघाडीच्या वतीने निफाड उपविभागीय कार्यालय येथे गुरुवार, दिनांक १२ जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजता दोन दिवसीय अन्नत्याग आंदोलन करण्यात येणार आहेत. प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष व माजी राज्य मंत्री बच्चू भाऊ कडू यांना आंदोलनाला बळ देण्यासाठी निफाड तालुक्यातील दिव्यांग बांधव, वृद्ध महिला, शेतकरी बांधव हे मोठ्या संख्येने उपस्थित राहून उपोषणास उपस्थितीत रहावे, असे आव्हान प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे निफाड तालुकाध्यक्ष सोमनाथ धुमाळ यांनी केले. यावेळी निफाड तहसील कार्यालयाच्या आवारात हे उपोषण होणार असून यात उपोषणकरते जयेश जगताप, सोमनाथ धुमाळ, अनिल भावसार, नवनाथ घोटेकर, संतोष पांडव, बाळू वाघचौरे, संजय विसपुते, रोशन तिडके, कपिल मूळक व कार्यकर्ते उपोषण ठिकाणी बसणार आहेत.

## शिरवळ जिमखान्याचे कार्य कौतुकास्पद - एल.डी.करंडे

**अक्षराज : बाळू धायगुडे**



**दि.११, खंडाळा (सातारा) :** परांजपे ऑटोकास्ट प्रा.लि.यांच्यावतीने सामाजिक दायित्व निधीतून शिरवळ जिमखान्याला बॅडमिंटन कोर्ट मॅट देण्यात आले. याचे उदघाटन नुकतेच कंपनीचे सिनियर प्रेसिडेंट एल.डी. करंजे, एच.आर डेप्यु.मॅनेजर विवेक पवार, सी.एस.आर. डेप्यु.मॅनेजर शिरीष पवार यांचे शुभहस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना एल.डी.करंजे म्हणाले, हल्ली शारीरिक स्वास्थ्याकडे सर्वांचे दुर्लक्ष होत आहे. ही गंभीर बाब असून सर्वांनी त्याची दखल घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना शिरवळ जिमखाना मोफत सराव व प्रशिक्षण देत आहे. हे शिरवळ जिमखान्याचे कार्य कौतुकास्पद आहे.त्यांच्या या कार्यास शुभेच्छा दिल्या. कंपनीच्या वतीने विवेक पवार व शिरीष पवार यांनी पुढील काळात सहकार्य केले जाईल असे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात स्वागत व प्रास्ताविक जिमखाना अध्यक्ष डॉ.विजय शिंदे यांनी केले. यावेळी डॉ.हर्षवर्धन अंतुरकर यांचा सहकार्याबद्दल सत्कार करण्यात आला. डॉ.श्रीयोग सावंत या कार्यक्रमा दरम्यान जिमखाना सदस्यत्व घेतले. कार्यक्रमास सरपंच रविराज दुधगावकर जिमखाना सचिव प्रा.डॉ.गणेश भुतकर, राजकुमार शहा, प्रताप भानुशाली, लालजीभाई पटेल, रमेश चव्हाण, हर्ष जोशी, अमोल जरांडे, प्रशांत कबुले, अजय चौगुले, विशाल राऊत, बॅडमिंटन प्रशिक्षक विशाल गायकवाड व विद्यार्थी खेळाडू बहुसंख्येने उपस्थित होते.